# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत
संदर्भ :- १. या कार्यालयाचे संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/५३६ दि.१२/०६/२०२० रोजीचे परिपत्रक

**महोदय/महोदया,**

इयत्ता १२ वी चा निकाल जाहिर झाल्याने सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाची पारंपारिक वरीष्ठ महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश प्रक्रीयेमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत म्हणून पुढील बाबींची खबरदारी घ्यावी.

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार तयार करण्यात आलेली प्रवेश नियमावली उपरोक्त संदर्भान्वये सर्व संलग्न कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांना पाठविलेली असून सदर प्रवेश नियमानुसार प्रवेश द्यावेत.

२. सद्यस्थितीत शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ दि. १२/०३/२०२० पासून लागू केला असल्याने पारंपारिक महाविद्यायांमध्ये प्रथम वर्षाकरिता ज्या महाविद्यालयांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध आहेत अशा महाविद्यालयांनी Online प्रवेश प्रक्रिया राबवावी.

३. ज्या महाविद्यालयांमध्ये अशी सुविधा उपलब्ध नाही अशा महाविद्यालयांनी कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त सुचनेनुसार तसेच Physical Distancing, मास्क, सॅनिटायझरचा वापर इ. बाबींचा अवलंब करून Offline प्रवेश प्रक्रिया राबवावी.

४. प्रवेश प्रक्रीया राबविताना विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करणे तसेच राखीव जागांबाबतचे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम पाळणे आवश्यक आहे.

५. प्रवेश देताना विद्यार्थ्यांकडून अँटी रॅगिंगबाबतचा फॉर्म भरून घेणे आवश्यक आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही.एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/१७७
दिनांक - ०३/०८/२०२१

D:\ssv\subb.doc